महा मेट्रो

PUNE METRO

मेट्रो ट्रेनचे पुण्यात लवकरच आगमन





पुणे , २२ .१२.२०१९: पुणे मेट्रोचे काम प्रगतीपथावर सुरु आहे आणि पुण्यामध्ये लवकरात लवकर ट्रेन चालविण्याची चाचणी महामेट्रो सुरु करत आहे. जून २०१७ ला मेट्रोच्या पहील्या पिलरच्या पायलिंगचे काम सुरु झाले. तदनंतर पुणे मेट्रोचे सिव्हिल बांधकाम, रेल टाकण्याचे काम, विद्युत तारांचे काम, सिग्नल व ईतर कामे अत्यंत रेकोर्ड वेळेत पूर्ण करण्यात आली. केवळ ३० महिन्यात ही सर्व कामे पूर्ण करण्यात आली. त्यामुळे पुणे मेट्रो साठी नागपूर मेट्रोच्या कॉंट्रैक्ट अंतर्गत सीआरआरसी CRRC ने बनविलेले नवीन ट्रेन कोच आणण्यात येत आहेत. फ़ैक्टरी मधून कोच बनविल्यानंतर कोच डेपो मध्ये विविध उपकरणांचे फ़िटिंग करण्यात येते, विविध चाचण्या करण्यात येतात तसेच मेट्रोचीं कोचेसचे रंगसंगती नुसार त्यांची बाह्य सजावट करण्यात येते ; सध्या पुणे येथे कोचिंग डेपोचे काम पूर्ण झाले नसल्यामूळे हया ट्रेन संचाना पहिले नागपुर येथे नेण्यात आले व प्राथमिक चाचण्या , उर्वरीत कामे करण्यात आली व पुणे मेट्रोचीं रंगसंगती नुसार त्यांची बाह्य सजावट करण्यात आली. एकुण दोन मेट्रो ट्रेन संच नागपूरहून निघाले आहे. दि २८/२९.१२.२०१९ या तारखेला हे दोन्ही ट्रेन संच पुण्यात दाखल होणार आहेत . प्रत्येक ट्रेन संचामध्ये ३ कोच असणार आहेत. एका ट्रेन मध्ये ९५०-९७० प्रवासी प्रवास करू शकतात. मेट्रो ट्रेनचे ३ कोच पैकी 1 कोच महिलांसाठी राखीव असेल . संपूर्ण ट्रेन वातानुकूलित असून त्यामध्ये अत्याधुनिक सोयी सुविधा पुरवल्या जाणार आहेत . हे तीनही डब्बे एकमेकांना जोडलेले असाणार आहेत त्यामुळे प्रवासी एका कोच मधून दुसऱ्या कोच मध्ये सहजगत्या जाऊ शकतील . हे ट्रेन संच पूर्णतः स्टेनलेस स्टील या धातूपासून बनविले आहेत. वजनाला हलके असलेल्या या ट्रेन संचामध्ये अत्याधुनिक एलईडी प्रकारचे दीवे लावलेले असून बाह्यप्रकाशाच्या तीव्रतेचे आतील दीवे आपोआप कमी अधिक तीव्र करण्याची यंत्रणा यात आहे. या ट्रेन चा अधिकतम वेग ९० किमी असणार आहे. या ट्रेन मध्ये मोबाईल , लॅपटॉप , चार्जिंग सुविधा असून प्रवाशांसाठी दृक श्राव्य सूचनाप्रणाली असणार आहे. आज दि. २२.१२.२०१९ रोजी हे ट्रेन चे संच नागपूरहून रोड द्वारे मोठ्या ट्रक मध्ये लादुन पुण्यासाठी निघाले आहेत. याप्रसंगी महामेट्रो चे

व्यवस्थापकीय संचालक डॉ ब्रिजेश दीक्षित यानी म्हटले आहें कीं " लवकरच मेट्रो ट्रेन मेट्रोच्या उन्नत मार्गावर चढ़विन्यात येतील व मेट्रो ट्रेन धावन्ण्याच्या चाचण्या सूरू करण्यात येतील'.